आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

२ नोव्हेंबर २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- देशभरात भाऊबीजेचा उत्साह, केदारनाथ आणि यमुनोत्रीचे दरवाजे बंद
- भाजपाचे ९९ टक्के बंडखोर उमेदवारी अर्ज मागे घेतील, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना विश्वास
- झारखंडमध्ये सत्तेत आल्यावर आदिवासी वगळता इतरांसाठी समान नागरी कायदा लागू करण्याचं भाजपाचं संकल्पपत्रात आश्वासन

**आणि**

- तब्बल १२ वर्षानंतर भारतीय संघात मायदेशातली कसोटी मालिका गमावली, २४ वर्षानंतर पहिल्यांदाच कसोटी मालिकेतल्या सर्व सामन्यात पराभव

**<><><><><>**

आज भाऊबीज, दिवाळीचा शेवटचा दिवस. भावाबहिणीच्या गोड नात्याला समर्पित असलेला हा सण देशाच्या वेगवेगळ्या भागात, भाई फोटा, भाई टीका, यमद्वितीया अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखला जातो. या दिवशी बहीण आपल्या भावाच्या टिळा लावून त्याला ओवाळते, त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते आणि भाऊ बहिणीला ओवाळणी घालतो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना भाऊबीजेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. या सणामुळे भावाबहिणींमधलं प्रेम अधिक घट्ट होईल, असं त्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. गृहमंत्री अमित शहा यांनीही समाजमाध्यमावरून शुभेच्छा दिल्या आहेत. प्रेम, समर्पणभाव आणि भक्तिभावाचा हा सण सर्वांच्या आयुष्यात भरभरून आनंद घेऊन येईल, असं त्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

भाजपाचे ९९ टक्के बंडखोर उमेदवारी अर्ज मागे घेतील असा विश्वास प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. जे बंडखोर उमेदवारी अर्ज मागे घेणार नाहीत, त्यांना ६ वर्षांसाठी पक्षातून निलंबित करू असा इशारा त्यांनी दिली.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज बुलडाणा जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

झारखंडमध्ये सत्तेत आल्यावर समान नागरी कायदा लागू करू, मात्र आदिवासींना त्याच्या कक्षेतून बाहेर ठेवू असं आश्वासन भाजपानं दिलं आहे. झारखंड विधानसभा निवडणुकीसाठीचं पक्षाचं संकल्प पत्र केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज रांचीमध्ये प्रसिद्ध केलं. त्यावेळी त्यांनी हे आश्वासन दिलं. संथाल परगणा भागातली बांग्लादेशी घुसखोरी रोखण्यासाठी कायदे बनवले जातील या लोकांनी आदिवासी महिलांसोबत विवाह करुन त्यांची जमीन हडपल्याचा दावा त्यांनी केला. कायदा झाल्यावर आदिवासींना त्यांच्या जमिनी पुन्हा दिल्या जातील. गोगो दिदी योजनेअंतर्गत सर्व महिलांना एकवीसशे रुपये देऊ असं आश्वासन सुद्धा त्यांनी दिलं. सर्व कुटुबांना ५०० रुपयात गॅस सिलिंडर, दसरा आणि रक्षाबंधनला १-१ गॅस सिलिंडर मोफत देण्याचं आश्वासन सुद्धा त्यांनी दिलं. पदवीधर आणि

पदव्युत्तर बेरोजगारांना २ वर्षांसाठी २ हजार रुपये मानधन देऊ. ५ वर्षात रोजगाराच्या ५ लाख संधी निर्माण करु. सरकारमधल्या ८७ हजार रिक्त जागा भरू असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

नंदुरबार जिल्ह्यात भरधाव जीपनं दिलेल्या धडकेत पाच जणांचा मृत्यू झाला. काल रात्री उशीरा नंदुरबार ते धानोरा रस्त्यावर लोय पिंपळोद गावाजवळ हा अपघात झाला. रस्त्याच्या कडेला नादुरुस्त दुचाकीजवळ उभ्या असलेल्यांना भरधाव गाडीनं धडक दिली. यात १२ ते ४० वर्ष वयोगटातल्या पाच जणांचा मृत्यू झाला. या अपघातात एक जण गंभीर जखमी असून त्याला नंदुरबार इथं जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं असल्याची माहिती, आमच्या वार्ताहरानं दिली आहे.

**<><><><><>**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात माओवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात दोन पोलीस जखमी झाले आहेत. जागरगुंडा या गावात आठवडी बाजारात तैनात असलेल्या या दोघांवर माओवाद्यांनी आज हल्ला केला. या घटनेनंतर या भागात शोधमोहीम आणखी तीव्र करण्यात आली आहे.

**<><><><><>**

प्रसिद्ध बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या उत्तराखंडमधल्या रुद्रप्रयाग जिल्ह्यातल्या  केदारनाथ धाम मंदीराचे दरवाजे आज विधिवत बंद करण्यात आले. हिवाळा ऋतुमुळे भाऊबीजेचा मुहुर्त साधत सकाळी साडेआठ वाजता दरवाजे बंद झाले. मंदिराचे दरवाजे बंद झाल्यानंतर बाबा केदार यांची पालखीचं उखीमठ इथल्या ओंकारेश्वर मंदिरात हिवाळी निवासासाठी प्रस्थान झालं. उत्तरकाशीतल्या

यमुनोत्री धाम मंदारीचे दरवाजेही आज दुपारी सव्वा बारा वाजता विधिवत बंद केले गेले.

**<><><><>**

दिल्ली-राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात हवेचा निर्देशांक अद्याप अतिशय वाईट आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानं दिलेल्या माहितीनुसार आज दुपारी १२ वाजता दिल्लीत हवेचा निर्देशांक ३७९ इतका नोंदवला गेला. पुढचे २ ते ३ दिवस दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात धुकं आणि धुराचा पातळ थर राहील, असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**<><><><>**

पंजाबमध्ये या वर्षभरात आतापर्यंत एक हजार किलोपेक्षा जास्त हेरॉईन जप्त करण्यात आलं आहे. सीमेपलीकडून होणाऱ्या अंमली पदार्थांच्या तस्करीला आळा घालण्यासाठी सीमा सुरक्षा दल आणि पंजाब पोलीस या दोघांनीही केलेल्या कारवाईअंतर्गत अंमली पदार्थांचा हा प्रचंड साठा जप्त केला आहे आणि पंजाब पोलिसांनी सीमेवर आणि त्या लगतच्या परिसरात दहा हजारांहून अधिक अंमली पदार्थ तस्करांना अटक केली आहे.

सीमा सुरक्षा दलानं पंजाबमध्ये भारतीय हद्दीत हेरॉईन आणि शस्त्रास्त्रं घेऊन जाणारे १८५ ड्रोन रोखले किंवा पाडले आहेत, असं महानिरीक्षक अतुल फुलझुले यांनी आकाशवाणीला सांगितलं.

**<><><><>**

बोत्स्वानाच्या राष्ट्राध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी डुमा बोको यांचं अभिनंदन केलं आहे. भारत आणि बोत्स्वानामधले परस्पर द्विपक्षीय

संबंध अधिक दृढ करण्यासाठी आपण त्यांच्यासोबत काम करायला उत्सुक असल्याचं प्रधानामंत्र्यांनी आपल्या अभिनंदनपर संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

अमेरिकेत कोलंबिया इथं झालेल्या कॉप सिक्सटिन परिषदेच्या सदस्य देशांच्या बैठकीत,भारताचे पर्यावरण राज्यमंत्री किर्ती वर्धन सिंग यांनी भारताचं अद्ययावत राष्ट्रीय जैवविविधता धोरण आणि कृती आराखडा मांडला. हा दस्तऐवज म्हणजे पर्यावरणीय आव्हानांचे अस्तित्व मान्य करून, त्याआधारे पुढची रणनिती ठरवण्याचा भारताचा प्रयत्न असल्याचे सिंग यांनी यावेळी सांगितले. ऱ्हास होत असलेल्या जैवविविधता परिसंस्थांचं पुनरुज्जीवन, पाणथळ जागांचं संरक्षण आणि सागरी आणि किनारपट्टीच्या क्षेत्रांच्या शाश्वत व्यवस्थापनावर या धोरणात भर दिला आहे, तसंच २०३० पर्यंत जैवविविधतेचा ऱ्हास रोखत, ती दूर करण्याच्या दृष्टीनं हा कृती आराखडा महत्त्वाचा असल्याची बाब त्यांनी अधोरेखीत केली.

**<><><><><>**

इस्राइलचं हवाई दल आणि तोफखान्यानं केलेल्या हल्ल्यात ४२ पॅलेस्टिनी नागरिकांचा मृत्यू झाला असून दीडशेहून अधिक जण जखमी झाले. मध्य गाझातल्या नुसेईरत विस्थापित छावणीवर शुक्रवारी सकाळपासून हा हल्ला सुरू होता. गाझामधल्या नागरिकांवर हल्ले करु नये यासाठी आंतरराष्ट्रीय समुदायानं इस्राइलवर दबाव टाकावा, असं आवाहन गाझातल्या सरकारनं केलं आहे. राफा आणि मध्य गाझामध्ये दहशतवाद्यांना ठार करणं, त्यांची ठिकाणं आणि शस्त्र उद्ध्वस्त करण्यासाठी हे हल्ले केल्याचं इस्राइली सुरक्षा दलानं म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारतीय क्रिकेट संघानं तब्बल १२ वर्षांनंतर घरच्या मैदानावर कसोटी मालिका गमावली आहे. सन २०००नंतर पहिल्यांदा भारतीय संघाला देशात झालेल्या कसोटी मालिकेतला एकही सामना जिंकला आलेला नाही.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या कसोटी क्रिकेट मालिकेतला मुंबईत वानखेडे मैदानावर झालेल्या तिसऱ्या आणि अखेरच्या कसोटी सामन्यात न्यूझीलंडनं भारताचा २५ धावांनी पराभव केला, आणि मालिका ३-० अशी जिंकली.

आज सामन्याच्या तिसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात न्यूझीलंडचा दुसरा डाव केवळ १४ चेंडूत ३ धावांची भर घालून १७४ धावांवर आटोपला. न्यूझीलंडच्या उर्वरीत एका खेळाडूला रविंद्र जडेजानं बाद केलं, आणि दोन्ही डावांत प्रत्येकी ५ गडी बाद करत, सामन्यात एकूण १० बळी टिपले.

पहिल्या डावातल्या २८ धावांच्या आघाडीमुळे भारतासमोर विजयासाठी १४७ धावांचं आव्हान होतं. मात्र न्यूझीलंडच्या फिरकी गोलंदाजांसमोर भारताची फलंदाजी गडगडली, आणि भारताचा दुसरा डाव केवळ १२१ धावांत आटोपला. अर्धशतकवीर ऋषभ पंत शिवाय आघाडीच्या कोणत्याही फलंदाजाला खेळपट्टीवर तग धरता आला नाही. ऋषभनं सर्वाधिक ६४ धावा केल्या. न्यूझीलंडच्या एजाज पटेल यानं दुसऱ्या डावात भारताचे ६ गडी बाद करत सामन्यात एकूण ११ बळी टिपले.

**<><><><><>**

स्वित्झर्लंडच्या लूजान इथं झालेल्या स्विस ओपन इनडोअर तिरंदाजी स्पर्धेत भारताच्या अतनू दास यानं कांस्यपदकाची कमाई केली. ऑलिम्पिकपटू असलेल्या अतनू यानं पुरुषांच्या रिकर्व्ह प्रकारात कांस्यपदकासाठीच्या सामन्यात

स्वित्झर्लंडच्या थॉमस रूफर याचा ६-४ असा पराभव केला. तत्पूर्वी उपांत्य फेरीत अतनूला फ्रान्सच्या रोमेन फिचेट यानं ६-४ असं हरवलं होतं.

<><><><><>

भारताची बॅडमिंटनपटू मालविका बनसोड हिनं हायलो ओपन बॅडमिंटन स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत तिनं डेन्मार्कच्या प्रतिस्पर्ध्याचा २३-२१, २१-१८ असा थेट गेम्समध्ये पराभव केला. तिचा अंतिम फेरीचा सामना आज रात्री डेन्मार्कच्याच, सातव्या मानांकित मिया ब्लिचफेल्ड हिच्याशी होणार आहे.

<><><><><>

कॉँगोमध्ये सुरु असलेल्या एटीपी चॅलेंजर टेनिस स्पर्धेत करण सिंग आणि फ्लोरेंट बॅक्स या भारतीय - फ्रेंच जोडीनं दुहेरीचं विजेतेपद पटकावलं. त्यांनी इटलीच्या सिमोन आणि दक्षिण आफ्रिकेच्या ॲलेक बेकली या जोडीला सरळ सेटमध्ये पराभूत केलं. हे या जोडीचं पहिलं व्यावसायिक विजेतेपद ठरलं आहे. या विजेतेपदासोबतच करण यानं क्रमवारीतही पहिल्या पाचशे जणांमध्ये स्थान मिळवलं आहे.

//<><><><><>//